3 जीवन विम्याची मूलतत्वे आणि कार्यपद्धती

घटक

भाग 1: विम्याची मूलतत्वे
भाग 2: विम्याच्या कार्यपद्धती

3

भाग 1: विम्याची मूलतत्वे

घटक	पाठ्यक्रम शिकण्याची निष्पत्ती
शिकण्याची उद्दिष्टे	
ओळख	
महत्वाचे शब्द	
क विम्याच्या वैध कराराचे महत्वाचे घटक	3.1, 3.2
ख विमा हित (इन्शूरेबल इंटरेस्ट)	3.3
ग परम सद्भाव	3.4
घ वस्तुस्थिती तथ्ये	3.5. 3.6
च क्षतिपूर्ती	3.7
महत्वाचे मुद्दे	
प्रश्नोत्तरे	
स्वयं-चाचणी प्रश्न	

शिकण्याची उद्दिष्टे

हे प्रकरण अभ्यासल्यानंतर, तुम्ही करु शकाल:

- वैध कराराची आवश्यक वैशिष्ट्ये समजावून सांगणे;
- विमा हित ही संकल्पना समजावून सांगणे आणि ते केव्हा आवश्यक आहे हे सांगणे;
- परमसद्भावाचे महत्व समजावून सांगणे;
- विमाकर्ता आणि विमाधारक यांच्या जाहीर करण्याच्या जबाबदारीचा आढावा घेणे;
- वस्तुस्थितीबाबतच्या तथ्यांचे महत्व समजावून सांगणे;

- जी तथ्ये उघड करण्याची गरज नाही त्यांचे वर्णन करणे;
- क्षतिपूर्तीची संकल्पना आणि त्याचे जीवन विम्यामधील महत्व समजावून सांगणे.

ओळख

विमा पॉलिसी हा विमा कंपनी आणि विमाधारक यांच्यामधील एक कायदेशीर करार आहे आणि तो करार वैध होण्यासाठी त्याने काही अटी पूर्ण करणे आवश्यक असते.

या प्रकरणामध्ये आपण वैध कराराची आवश्यक वैशिष्ट्ये कुठली हे पाहणार आहोत, त्यामध्ये केवळ विम्याच्या करारांना लागू असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण मूलतत्वांचाही समावेश आहे.

महत्वाचे शब्द

या प्रकरणामध्ये पुढील शब्द आणि संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे:

प्रस्ताव आणि स्वीकार	मोबदला	दोन्ही पक्षांची सहमती	विमा हित
महत्वाच्या व्यक्तीचा विमा	परम सद्भाव	प्रकट करण्याची जबाबदारी	वस्तुस्थितीविषयीची तथ्ये
अब इनिशियो (सुरुवातीपासून)	निर्विवाद कलम	क्षतिपूर्ती	करार करण्याची क्षमता
क्षतिपूर्ती करार	मूल्य करार		

क) विम्याच्या वैध करारचे आवश्यक घटक

विमा करार हा विमा कंपनी आणि विमाधारकादरम्यानचा कायदेशीर करार आहे, ज्यामध्ये विमाधारक व्यक्ती विमा कंपनीला हप्ता देण्याचे मान्य करते

आणि विमा कंपनी विमाधारक व्यक्तीला काही झाल्यास विशिष्ट रक्कम देण्याचे मान्य करते.

दोन्ही पक्ष कायद्याने बांधील करार कसा करतात आणि हा करार वैध ठरण्यासाठी दोन्ही पक्षांनी कोणत्या अटी पूर्ण करणे आवश्यक आहे?

या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, आपण आधी वैध करारची आवश्यक वैशिष्ट्ये पाहू, आणि त्यानंतर आपण विमा करार हा इतर करारांपेक्षा कसा वेगळा आहे हे पाहू.

क)1 वैध कराराची वैशिष्ट्ये

कायदेशीर करार वैध होण्यासाठी खालील वैशिष्ट्ये आवश्यक आहेत:



यातील सर्वात महत्वाची वैशिष्ट्ये आहेत **प्रस्ताव आणि स्वीकार** आणि **मोबदला**

क)1 (अ) प्रस्ताव आणि स्वीकार

जेव्हा एक पक्ष प्रस्ताव देतो आणि दुसरा पक्ष तो विनाअट स्वीकारतो तेव्हा एक करार अस्तित्वात येतो. विनाअट स्वीकार कसे कार्य करतो हे आपल्याला एका उदाहरणाद्वारे समजणे सोपे होईल. खालील संभाषण पहा:

उदाहरण

अबक विमा कंपनी: 'तुमच्या प्रस्ताव अर्जाच्या आधारे आम्ही तुम्हाला, xxxxx रुपये विमाकृत रकमेद्वारे संरक्षण देऊ शकतो.'

गणेश, प्रस्तावकर्ता (ज्या व्यक्तीला विमा घ्यायचा आहे): 'मी स्वीकारतो.'

या उदाहरणामध्ये, गणेशच्या स्वीकार करण्यामुळे अबकच्या प्रस्तावामधल्या कोणत्याही अटींमध्ये बदल झाला नाही आणि हा स्वीकार विनाअट झाला आहे. इथे करार केला जातो, अर्थात इतर आवश्यक घटक असणेही गरजेचे आहे.

आता, गणेशचे दुसरे उत्तर पाहू:

उदाहरण

अबक विमा कंपनी: 'तुमच्या प्रस्ताव अर्जाच्या आधारे आम्ही तुम्हाला, xxxxx रुपये विमाकृत रकमेद्वारे संरक्षण देऊ शकतो.'

गणेश, प्रस्तावकर्ता (ज्या व्यक्तीला विमा घ्यायचा आहे): 'मी स्वीकारतो, मात्र मला विमाकृत रक्कम रु. yyyyy इतकी वाढवायची आहे.'

या प्रकरणी, गणेशने विनाअट प्रस्ताव स्वीकारला नसल्यामुळे करार झाला नाही. अबक जोपर्यंत नव्या अटी न घालता गणेशचा पुनर्प्रस्ताव स्वीकारत नाही, तोपर्यंत करार होणार नाही.

क)1 (ख) मोबदला

करार वैध होण्यासाठी त्याला मोबदल्याचा आधार असणे आवश्यक आहे. वाटाघाटींमधील प्रत्येक व्यक्तीची बाजू जी कराराचा आधार असते त्याला मोबदला असे म्हणता येईल. कराराच्या कायद्यामध्ये मोबदला म्हणजे केवळ एक मूल्य असते जे पुरविले जाते आणि ते करार होण्यासाठी प्रेरक ठरते. पैसे देणे हे मोबदल्याचे नेहमीचे स्वरुप आहे, मात्र एकमेव स्वरुप नाही. विमा पॉलिसीच्या संदर्भात, हप्ता म्हणजे विमाधारकाचा मोबदला मानला जातो.

क)1 (ग) करार करण्याची क्षमता

ज्या व्यक्ती करार करतात त्यांची तसे करण्याची योग्यता असली पाहिजे. व्यक्ती करार करण्यास योग्य मानली जाते जर ती:

- सज्ञान असेल (वय 18);
- मानसिक स्थिती योग्य असलेली असेल; आणि
- कायद्याने कुठलाही करार करण्यास अपात्र न ठरवलेली असेल

या तरतुदीनुसार ज्या व्यक्ती सज्ञान नाहीत (18 वर्षांखालील आहेत) त्या विमा करार करु शकत नाहीत. त्याशिवाय, ज्या व्यक्तीची मानसिक स्थिती चांगली नाही आणि अशी कुठलीही व्यक्ती ज्याला कायद्याने बंदी घातली आहे ती विमा करार करु शकत नाही. वरील व्यक्तींपैकी कुणीही करार केला तर तो रद्द आणि समाप्त मानला जाईल.

क)1 (घ) दोन्ही पक्षांची समान मुद्यावर सहमती (कंसेंसस ऍड आयडेम)

सोप्या शब्दात याचा अर्थ म्हणजे करार करणाऱ्या दोन्ही पक्षांनी एकच गोष्ट, एकाच अर्थाने समजून घेऊन त्यावर त्यांचे एकमत झाले पाहिजे. एंजटने ज्या अर्थाने (पद्धतीने) त्यांना समजावून सांगितले आहे त्याचप्रकारे विमा पॉलिसीची वैशिष्ट्ये प्रस्तावकर्त्याला समजली पाहिजेत.

क) 1 (च) उद्देश किंवा हेतूचा कायदेशीरपणा

करारातील दोन्ही पक्षांचा उद्देश एक कायदेशीर नाते करणे आहे. या कराराचा हेतूही कायदेशीर असला पाहिजे.

उदाहरण

एखाद्या नवऱ्याने बायकोचा जीवन विमा काढून, तिला ठार मारुन हा अपघाती मृत्यू असल्याचे दाखवून, कायदेशीर भोगवटादार म्हणून दाव्याच्या रकमेचा फायदा घेणे बेकायदेशीर आहे. विमा बेकायदा हेतूसाठी किंवा त्यापासून आर्थिक फायदे मिळवण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही.
अशा बेकायदा कृतीचे आणखी एक उदाहरण म्हणजे एखाद्या कर्जबाजारी व्यक्तीने मोठ्या रकमेचा जीवन विमा काढून आपल्या कुटुंबाला दाव्याच्या रकमेचा फायदा मिळावा यासाठी आत्महत्या केली. पॉलिसीच्या पहिल्या वर्षात आत्महत्येमुळे झालेल्या मृत्यूचे दावे बहुतेक सर्व जीवन विमा कंपन्या वगळतात.

क)1 (छ) कार्यनिष्पादन क्षमता

कराराचे दोन्ही पक्षांकडून पालन झाले पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने मोठ्या रकमेच्या जीवन विम्यासाठी विनंती केली असेल तर त्याला आवश्यक हप्ते भरता आले पाहिजेत.
करार आणि त्याचे नियम निश्चित पाहिजेत आणि प्रत्येक ठिकाणच्या कायद्याच्या आवश्यकतेनुसारच त्यांनी कार्य केले पाहिजे.

याचा विचार करा......

जिगरने विमा कंपनीला 75 लाख रुपयांच्या जीवन विमा संरक्षणासाठी 12,000 रुपयांचा हप्ता असलेला प्रस्ताव दिला. वैद्यकीय परीक्षणादरम्यान कंपनीला आढळून आले की जिगरला काही आजार आहे आणि त्याची जोखीम ही सामान्य जोखीमेपेक्षा अधिक आहे. त्यामुळे विमा कंपनीने त्याला 12,000 रुपयांऐवजी 15,000 रुपयांचा हप्ता द्यावा लागेल असे सांगितले.
प्रस्ताव आणि स्वीकारच्या संदर्भात वरील परिस्थितीत तुम्ही काय कराल?

प्रश्न 3.1

वैध कराराची आवश्यक वैशिष्ट्ये कोणती?

क)2 पॉलिसीचे कागदपत्र

विमाधारक व्यक्ती आणि विमा कंपनी या दोघांनीही, मान्य केलेल्या अटी स्पष्ट असाव्यात म्हणून, एक पॉलिसी दिली जाते. पॉलिसीमध्ये संरक्षण, संरक्षणाचा कालावधी, अपवाद, अटी, हप्ता आणि इतर आवश्यक माहिती असा सगळा तपशील दिलेला असतो. पॉलिसी म्हणजे केवळ विम्याचा कारारच नाही तर या करारचा पुरावाही आहे.

विमा कंपनीने विमा प्रस्ताव स्वीकारला, अटींबाबत सहमती झाली, हप्ता देण्यात आला किंवा देण्याचे मान्य करण्यात आले की विम्याचा करार लागू होतो. अशा प्रकारे, मूळ पॉलिसीचे कागदपत्र राहीले नाही तरी करार राहतो. कागदपत्र गहाळ झाले किंवा नसेल तर त्यामुळे करार अवैध होत नाही, मात्र मान्य करण्यात आलेल्या अटींबाबत काही वाद निर्माण झाला तर पुरावा म्हणून या पॉलिसीचा उपयोग होतो. या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात आपण पॉलिसीची रचना आणि घटक तपशीलवार पाहू.

क3 विम्याच्या करारामध्ये विमा एजंटची भूमिका

कायद्याच्या नजरेत एका व्यक्तीच्या वतीने काम करणारी दुसरी व्यक्ती ही 'एजंट' असते. आपण जर कुणाला आपल्यावतीने काम करण्याची परवानगी दिली, तर ते कराराच्या अटींनुसार आपल्या वतीने जे करतील त्याची जबाबदारी आपल्याला कदाचित उचलावी लागेल. हे विम्याच्या बाबतीत, आणि जिथे मध्यस्थांचा सहभाग असेल, कायदेशीर नातेसंबंध असेल, तिथे खरे आहे.

आपण प्रकरण 1मध्ये पाहिले की विमा उद्योगामध्ये विविध प्रकारच्या मध्यस्थांचा सहभाग असतो आणि 'एजंट' हा शब्द विमा कंपनीने त्यांच्या वतीने कंपनीची उत्पादने विकण्यासाठी मानधनावर ठेवलेल्या परवनाधारक मध्यस्थासाठी वापरला जातो. असे करतांना मध्यस्थ कायदेशीर 'एजंट' होतो

आणि ‘मूलतत्वांच्या’ वतीने (याठिकाणी, विमा कंपनी) काम करु लागतो. त्यांना ‘मूलतत्वाच्या’ वतीने ‘मूलतत्व’ आणि तृतीय पक्ष (या ठिकाणी प्रस्ताव करणारा/ ज्याला विमा घ्यायचा आहे) यांच्यात करारचे नाते निर्माण करण्यासाठी अधिकृत करण्यात आले असते.

जाणून घ्या

तुम्हाला प्रकरण 1 मधील काही मध्यस्थ ज्यांना संमिश्र दलाल म्हणतात हे स्वतंत्र सल्लागार असतात हे आठवत असेल. त्यांचा कायदेशीर दर्जा हा थोडा गुंतागुंतीचा असतो कारण ते काही गोष्टी ग्राहकाच्या वतीने करतात तर काही गोष्टी विमाकर्त्याच्या वतीने करतात आणि त्यामुळे ते विमाधारक आणि विमाकर्ता असे दोघांचे एजंट असतात (ते कुठले कार्य करत आहेत त्याच्या स्वरुपावर अवलंबून असते).

जाणून घ्या

विमा करार हा विशेष करार आहे आणि त्याला अतिरिक्त मूलतत्वे आणि वर वर्णन करण्यात आलेले वैध कराराचे घटक लागू होतात.

आपण पुढील विभागामध्ये ही अतिरिक्त मूलतत्वे पाहू.

ख) विमा हित

विमा हित हा वैध विमा करार तयार करण्यासाठी आवश्यक घटकांपैकी एक घटक आहे.

ख)1 विमा हित म्हणजे काय?

खालील प्रकरणाच्या अभ्यासाने तुम्हाला विमा हित म्हणजे काय हे समजण्यास मदत होईल:

घटना अभ्यास

गणेश हा 30 वर्षांचा असून एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये (एमएनसी) मध्ये काम करतो. गणेशची पत्नी एका देशी कंपनीमध्ये काम करते आणि ती त्यांच्या गृहकर्जामध्ये सहअर्जदार आहे. गणेशची नोकरी चांगल्या पगाराची आहे, तो घराचा सगळा खर्च उचलतो, त्याच्यावर गृहकर्ज आणि गाडीचे कर्ज आहे. ही संपत्ती मिळवण्यासाठी गणेशने खूप कष्ट केले आहेत. आत्तापर्यंत सर्व काही गणेशच्या नियोजनाप्रमाणे चालले आहे. कल्पना करा, खालील परिस्थिती निर्माण झाल्यास:

परिस्थिती 1: गणेशला अपघात झाला आणि त्याला महिनाभरासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.
परिस्थिती 2: गणेशच्या पत्नीचा अनपेक्षितपणे मृत्यू झाला.

वरील परिस्थितीचा आणि त्यावरील संभाव्य तोडग्यांचा आपण आणखी जवळून विचार करु.

परिस्थिती 1: गणेश किमान एक महिना काम करु शकणार नाही. त्याला तेवढ्या दिवसांचा पगार मिळणार नाही आणि रुग्णालयाचा खर्चही करावा लागेल जो अतिशय महाग असेल. ही परिस्थिती टाळण्यासाठी गणेशला पुरेसा आरोग्य विमा असल्याची खात्री करावी लागेल ज्यामुळे त्याला अनपेक्षित वैद्यकीय आणीबाणीमध्ये संरक्षण मिळेल आणि वैद्यकीय कारणामुळे तो कामावर गैरहजर राहिला तरी पगाराचे नुकसान भरुन निघेल.

परिस्थिती 2: गणेशची पत्नी, कुटुंबाच्या मिळकतीला हातभार लावण्याबरोबरच, कुटुंबाचीही काळजी घेते. तिच्या अनपेक्षित मृत्यूनंतर, गणेशला गृहकर्ज फेडण्यात आणि इतर आर्थिक देणी देतांना अडचणी येतील. वरील परिस्थितीमध्ये संरक्षण मिळवण्यासाठी गणेश त्याच्या बायकोचा जीवन विमा काढू शकतो, ज्यामुळे तिचा अनपेक्षित मृत्यू झाला तर पैसे मिळतील, ज्यामुळे कुटुंबावर आर्थिक संकट येणार नाही. गणेशची बायको गणेशचा जीवन विमा काढू शकते ज्यामुळे त्याचा अनपेक्षित मृत्यू झाल्यास पैसे मिळतील.

वरील परिस्थितीवरुन तुम्हाला लक्षात येईल की **गणेशने विमा काढला नसेल तर दोन्ही पैकी कुठलीही घटना घडली तरी त्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम** होईल.

याचा विचार करा........

या परिस्थितीवरुन आपल्याला विमा हित म्हणजे काय हे समजण्यास किती मदत होते?

जेव्हा एखाद्या व्यक्तीला दुसरी (ऱ्या) व्यक्ती किंवा संपत्ती यांचे अस्तित्व कायम राहिल्याने किंवा सुस्थितीत राहिल्याने मिळकत किंवा फायदा होऊ

शकतो आणि त्याचवेळी जर एका व्यक्तीला, दुसरी (ऱ्या) व्यक्ती किंवा संपत्ती यांची हानी झाल्यामुळे आर्थिक नुकसान किंवा अडचण होते तेव्हा त्याला विमा हित असे म्हणतात.

या घटनेच्या अभ्यासावरुन आपण पाहू शकतो की गणेशची स्वतःची चांगली तब्येत आणि पत्नीचे आयुष्य या दोन्हींमध्ये विमा हित आहे कारण दोघांची स्थिती चांगली असेल तर त्याला फायदा होईल, आणि त्यांच्यापैकी एकाचे किंवा दोघांचे काही नुकसान झाले तर त्याच्यावर विपरित आर्थिक परिणाम होतील.

ख)2 विमा हिताचे महत्व/संदर्भ

तुम्हाला आता विमा हिताचा अर्थ कळल्यानंतर विम्यामध्ये त्याचे महत्व/संदर्भ किंवा उपयोग काय असा तुम्ही विचार करत असाल? **विमा हित हा विम्याचा अतिशय महत्वाचा सिद्धांत आहे.** व्यक्तीला कुठल्याही प्रकारचा विमा काढण्यासाठी ज्या विषयवस्तूला संरक्षित करायचे आहे त्यामध्ये विमा हित असणे आवश्यक आहे. विषयवस्तू म्हणजे विमा काढलेली एखादी वस्तू किंवा घटना आणि त्या व्यक्तीचे स्वतःचे आयुष्य, इतरांचे आयुष्य किंवा संपत्तीही असू शकते. विमा हित, विमा काढला जाऊ शकतो अथवा नाही हे ठरवण्याकरता कायदेशीर आधार तयार करते.

सारांश: कायद्याची मान्यता असलेल्या व कायदेशीर नातेसंबंध असलेल्या विषयवस्तूचा विमा काढण्याचा व्यक्तीचा अधिकार म्हणजे विमा हित होय.

ख)3 विमा हित कुठल्या परिस्थितीमध्ये अस्तित्वात असते

कुठल्या परिस्थितीमध्ये विमा हित अस्तित्वात असल्याचे मानले जाते हे न्यायालयाच्या काही निकालांमधून सिद्ध झाले आहे.
सर्वसाधारण कायद्यानुसार, खालील परिस्थितींमध्ये विमा हित अस्तित्वात असल्याचे मानले जाते:

- **स्वतःचे आयुष्य:** व्यक्तीला स्वतःच्या आयुष्यात अमर्याद विमा हित असते.

उदाहरण

गणेश त्याच्या भविष्यातील मिळकतीच्या सध्याच्या मूल्याच्या समान रकमेएवढ्या रकमेचा जीवन विमा काढू शकतो. त्याचबरोबर, तो नसेल तर त्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी किती पैसे लागतील याचेही कदाचित तो मूल्यांकन करेल- जसे गृहकर्ज, गाडी कर्ज, कुटुंबाचा दैनंदिन खर्च इत्यादी.

आवश्यक जीवन विम्याची रक्कम ठरवण्यासाठी दुसरी पद्धत म्हणजे वार्षिक उत्पन्नाच्या 15 पट किंवा 20 पट रक्कम धरली जाते.

- **पती-पत्नी-** पतीचे पत्नीच्या आयुष्यामध्ये विमा हित असते, त्याचप्रमाणे पत्नीचे पतीच्या आयुष्यामध्ये विमा हित असते. दोघे सुस्थितीत असण्याचा फायदा दोघांनाही होतो आणि दोघांपैकी कुणालाही काही झाले तर दोघांवरही त्याचा विपरित परिणाम होतो. म्हणूनच पती पत्नीसाठी तसेच पत्नी पतीसाठी जीवन विमा काढू शकते.
- **मुले:** जेव्हा मुले त्यांच्यावर अवलंबून असतात तेव्हा पालक त्यांचा विमा काढू शकतात. मुले सुद्धा जेव्हा पालक त्यांच्यावर अवलंबून असतात, तेव्हा त्यांचा विमा काढू शकतात. गणेश म्हणूनच, त्याच्या

मुलांसाठी जीवन विमा काढू शकतो. त्याचप्रमाणे जेव्हा गणेश म्हातारपणी मुलांवर अवलंबून असेल तेव्हा त्याची मुले त्याच्यासाठी आरोग्य विमा काढू शकतात.

- **संपत्ती:** व्यक्तीच्या मालकीच्या संपत्तीमध्ये त्याचे विमा हित असते कारण त्याच्या वापरामुळे त्याला फायदा होतो आणि त्या संपत्तीचे नुकसान झाले तर त्यांच्यावर विपरित परिणाम होतो.



प्रश्न 3.2
अशा काही व्यावहारिक परिस्थितींची यादी करा ज्यामध्ये व्यक्तीसाठी विमा हित अस्तित्वात असल्याचे मानले जाते.

ज्या इतर परिस्थितींमध्ये व्यक्तीसाठी विमा हित अस्तित्वात असल्याचे मानले जाते त्यामध्ये समावेश आहे:

- कर्जपुरवठादार: कर्जपुरवठादाराने कर्जदाराला व्याजावर पैसे दिले असल्यामुळे त्याच्या आयुष्यामध्ये कर्जपुरवठादाराला त्या कर्जाच्या मर्यादेपर्यंत विमा हित असते.

उदाहरण
जर गणेशने कैलासकडून 10,000 रुपये उधार घेतले असतील तर कैलासला त्या 10,000 रुपयांपर्यंत गणेशच्या आयुष्यात विमा हित असेल.
कारण गणेशला काही झाले तर कैलासला त्याचे 10,000 रुपये मिळणार नाहीत आणि त्याचे नुकसान होईल. त्यामुळे या प्रकरणी कैलास गणेशच्या आयुष्यावर 10,000 रुपयांपर्यंतचा विमा काढू शकतो.

- **हमीदार:** कर्जाला हमी देणाऱ्या हमीदाराचे मुख्य कर्जदाराच्या आयुष्यामध्ये विमा हित असते तसेच कर्जाच्या रकमेऐवढे सह-हमीदाराच्या आयुष्यामध्येही विमा हित असते.
- **कर्मचारी-मालक:** एका कर्मचाऱ्याला त्याच्या मासिक पगारापुरते त्याच्या मालकाच्या आयुष्यामध्ये विमा हित असते.
- **मालक-कर्मचारी:** मालकाला त्याचे कर्मचारी देत असलेल्या सेवेपुरते त्यांच्या भल्यामध्ये विमा हित असते, उदाहरणार्थ एखादा कर्मचारी आजारी पडला आणि बराच काळ कामावर गैरहजर राहिला तर

त्यामुळे तो करत असलेले काम पूर्ण करुन देण्यावर परिणाम होऊ शकतो.

- **महत्वाच्या व्यक्तींचा विमा:** कंपनीचे काही विशिष्ट महत्वाच्या व्यक्तींच्या आयुष्यामध्ये विमा हित असते. अशा व्यक्तींच्या आयुष्यावर कंपनी **महत्वाच्या व्यक्तींचा विमा** काढू शकते.
- **भागीदार:** व्यवसायातील भागीदारांचे एकमेकांच्या आयुष्यामध्ये विमा हित असते.

जाणून घ्या

जीवन विम्यामध्ये, पॉलिसी घेत असतांना विमा हित अस्तित्वात असणे (सिद्ध करणे) आवश्यक आहे, म्हणजे पॉलिसीची सुरुवात होतांना गरजेचे आहे. काही दावा असल्यास, त्यावेळी विमा हित असेल किंवा नसेलही आणि तेव्हा ते सिद्ध करण्याची गरज नाही.

सर्वसाधारण विम्यामध्ये, विमा हित पॉलिसी सुरु करतांना **आणि दावा करतांना** दोन्ही वेळा अस्तित्वात असले पाहिजे.

जहाज वाहतुकीच्या विम्याला वेगळे नियम लागू होतात ज्यामध्ये विमा हित केवळ दाव्याच्या वेळी अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

ग) परम सद्भाव

विम्याचा करार वैध होण्यासाठी परम सद्भाव अस्तित्वात असणेही आवश्यक आहे.

ग)1 परम सद्भावाचे महत्व

खालील परिस्थितीमध्ये तुम्हाला परम सद्भावाचा सिद्धांत समजायला मदत होईल:

परिस्थिती

राजेशने ठराविक मुदतीची 50 लाख रुपयांची 20 वर्षांसाठीची विमा पॉलिसी घेतली आहे.

एक दिवस राजेश कार्यालयातून घरी परतत असतांना त्याला रस्त्यावर अपघात झाला आणि त्यात दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला.

राजेशची पत्नी कोमलने (पॉलिसीमध्ये नामनिर्देशित) विमा कंपनीकडे दावा केला. विमा कंपनीने विम्याचा दावा फेटाळल्यामुळे कोमलला आश्चर्य वाटले. कोमलला खरोखरच अतिशय त्रास झाला आणि दावा का फेटाळण्यात आला याचे कारण तिने विचारले. विमा कंपनीला त्यांच्या तपासात आढळून आले होते की कमी हप्त्याचा फायदा मिळावा यासाठी राजेशने वयाचा खोटा दाखला सादर करुन त्याच्या प्रत्यक्ष वयापेक्षा पाच वर्षे कमी वय जाहीर केले होते. राजेशने जाणून बुजून विमा पॉलिसी चांगल्या अटींवर मिळवण्यासाठी विमा कंपनीची दिशाभूल केली होती. यामुळे विमा कंपनीने ती पॉलिसी रद्द ठरवली आणि राजेशच्या पत्नीचा दावा फेटाळला.

प्रस्ताव देणाऱ्याला स्वतःबद्दलचा सगळा तपशील माहिती असतो आणि विम्याचा प्रस्ताव अर्ज सादर करतांना सर्व खरी माहिती जाहीर करणे आणि योग्य कागदपत्रे सादर करणे ही त्याची नैतिक जबाबदारी आहे.

व्यक्तीचे वय हा जीवन विमा पॉलिसीचा हप्ता निश्चित करण्यासाठी महत्वाचा निकष आहे ज्यामध्ये राजेशने बदल केला.

ज्या उत्पादनाला स्पर्श करता येतो त्याच्या खरेदीच्या करारामध्ये, प्रत्येक पक्ष वस्तू तपासून पाहू शकतो. एक पक्ष दुसऱ्या पक्षाची दिशाभूल करत नसेल आणि दुसऱ्या पक्षाच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली, तर दुसऱ्या पक्षाने करार टाळण्याचा प्रश्नच येत नाही. फ्रिज खरेदी करतांना, त्याची वैशिष्ट्ये तपासली जाऊ शकतात आणि तो व्यवस्थित काम करत आहे ना हे पाहण्यासाठी सुरु केला जाऊ शकतो. कुठलीही वस्तू किंवा सेवांच्या खरेदीमध्ये '*कॅव्हीएट एंप्टर*' किंवा 'खरेदी करणाऱ्याने जाणून घ्यावे' हा नियम लागू होतो.

मात्र विम्यामध्ये असे चालत नाही. आपण केवळ पॉलिसी वाचू शकतो मात्र ती कशी काम करते हे केवळ दाव्याच्या वेळीच आपल्याला समजते. इथे स्पर्श करण्यासारखे किंवा पाहण्यासारखे काही नाही. त्याचप्रमाणे विमा कंपनी, जोखीम स्वीकारायची किंवा नाही अथवा कोणत्या अटींवर स्वीकारायची याचा निर्णय घेण्यासाठी पूर्णपणे प्रस्ताव देणाऱ्याच्या माहितीवर अवलंबून असते.

वरील परिस्थितीद्वारे दिसून येते की जाणीवपूर्वक महत्वाची तथ्ये दाबून ठेवण्यास परवानगी नाही. म्हणूनच विमा करारांना वेगळे नियम लागू होतात आणि अधिक जबाबदारपणाची गरज असते ज्याला परम सद्भाव म्हणतात.

ग)2 परम सद्भावाची व्याख्या

आपण परम सद्भावाची व्याख्या अशा प्रकारे करु शकतो:

'विनंती केली किंवा नाही तरीही स्वेच्छेने, प्रस्तावित जोखीमेची, सर्व महत्वाची तथ्ये, अचूक आणि पूर्ण जाहीर करण्याची सकारात्मक जबाबदारी'

याचा अर्थ असा होतो की करारातील पक्षांनी करार होण्यापूर्वी सर्व तथ्ये व माहिती स्वेच्छेने द्यावी. हा सिद्धांत प्रस्ताव देणारा तसेच विमाकर्ता दोघांना कराराच्या वाटाघाटींमध्ये लागू होतो, मात्र कायद्याच्या दृष्टीने प्रस्ताव देणारा हा महत्वाच्या तथ्यांचा मुख्य पुरवठादार आहे. महत्वाची तथ्ये म्हणजे काय हे आपण घ विभागामध्ये समजावून घेऊ.

परम सद्भावाच्या कर्तव्याचे उल्लंघन

परम सद्भावाच्या कर्तव्याचे उल्लंघन खालील प्रकारे वर्गीकृत केले जाऊ शकते:

- एखादे महत्वाचे तथ्य जाहीर करतांना अजाणतेपणी किंवा प्रस्ताव देणाऱ्याला ते महत्वाचे न वाटल्यामुळे प्रकटीकरण न करणे किंवा वगळणे.

उदाहरणार्थ, अजयने एबीसी कंपनीकडे जीवन विम्यासाठी अर्ज करतांना, लहानपणी त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली होती हे जाहीर केले नाही. ही शस्त्रक्रिया त्याच्या लहानपणी म्हणजे 15 वर्षांपूर्वी झाली असल्याने, आणि त्यातून तो बराच पूर्वी पूर्णपणे बराही झाल्यामुळे, विमा कंपनीला ही माहिती जाहीर करणे त्याला महत्वाचे वाटले नाही.

- महत्वाचे तथ्य **लपवणे.**

उदाहरणार्थ अजय रोज दारु पितो. मात्र, जीवन विम्यासाठी अर्ज करण्यापूर्वी एक महिनाभर त्याने दारु घेतली नाही, त्यामुळे वैद्‌यकीय चाचणीमध्ये ते कळणार नाही आणि त्याला चांगल्या अटींवर विमा मिळेल असे त्याला वाटले.

- विमाकर्त्याला फसवण्याच्या उद्देशाने **फसवेपणाने चुकीची माहिती** किंवा विधान करणे.

उदाहरणार्थ, अजयने त्याच्या खऱ्या वयापेक्षा वय पाच वर्षे कमी असल्याचे जाहीर केले. त्याला आधार म्हणून त्याने वयाच्या पुराव्याची खोटी कागदपत्रे तयार करुन चांगल्या अटींवर विमा मिळवण्यासाठी ती विमा कंपनीला सादर केली.

- **निरुपद्रवी चुकीची माहिती** किंवा चुकीची विधाने जी खरी असल्याचे मानले जाते.

ग) 3 प्रकटीकरणाचे कर्तव्य

आधी समजावून सांगितल्याप्रमाणे, विम्याच्या वाटाघाटींमध्ये महत्वाची तथ्ये जाहीर करणे ही जबाबदारी आहे; प्रस्तावाच्या पातळीवर, करार अस्तित्वात येण्यापूर्वी, हे विशेषतः अतिशय महत्वाचे आहे. जाहीर करण्याची जबाबदारी नुतनीकरणाच्या प्रत्येक तारखेला नव्याने लागू होते.

विमाधारकाचे प्रकटीकरणाचे कर्तव्य

प्रस्ताव देणाऱ्याने सर्व महत्वाची तथ्ये पूर्णपणे जाहीर करणे महत्वाचे आहे, बहुतांश प्रकरणांमध्ये, विषय वस्तूची संपूर्ण परिस्थिती केवळ प्रस्ताव देणाऱ्यालाच माहिती असते. विमा कराराच्या संपूर्ण कालावधीमध्ये विमाधारकाने विमाकर्त्याशी परम सद्भाव व्यवहार कायम राखला पाहिजे.

उदाहरणे

- प्रस्तावकर्त्याने त्यांच्या तब्येतीसंदर्भातील सर्व तथ्ये नमूद केली पाहिजेत. विमाकर्त्याच्या निर्णयावर परिणाम होईल असा काही आजार त्यांना असल्यास, प्रस्तावाच्या वेळीच तो जाहीर करणे आवश्यक आहे.
- प्रस्तावकर्त्याने त्यांचे योग्य वय जाहीर करणे आणि वयाचा दाखला देणारी योग्य कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
- जर प्रस्तावकर्ता धूम्रपान किंवा मद्यपान करत असेल तर प्रस्ताव अर्जामध्ये तसे नमूद करणे आवश्यक आहे.
- प्रस्तावकर्त्याला कुठल्याही कंपनीने विमा देणे नाकारले असेल किंवा प्रस्ताव जास्त हप्ता घेऊन मान्य केला असेल तर त्याच्या कारणासहित ते प्रस्ताव अर्जावर लिहीणे आवश्यक आहे.

विमाकर्त्याचे **प्रकटीकरणासंबंधी कर्तव्य**

विमाकर्त्याचीही विमा धारकाला जाहीर करण्याची जबाबदारी असते. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी, विमाकर्त्याने परम सद्भाव कायम राखणे आवश्यक आहे.

उदाहरणे

- विमाकर्त्याने त्यांच्या माहितीसाहित्यात विमा उत्पादनांविषयी सर्व माहिती जाहीर केली जाईल याची खात्री करणे आवश्यक आहे, जसे माहितीपत्रके, माहितीपुस्तिका, वेबसाईट इत्यादी.
- विमा कंपन्या, धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींना धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत कमी हप्ता आकारतात.
- आरोग्यविम्यासंदर्भात, नुतनीकरणाच्यावेळी, संपूर्ण वर्षामध्ये विमाधारकाने काही दावा केला नसेल तर काही कंपन्या हप्त्यामध्ये सवलत देतात किंवा हप्ता तोच ठेवून संरक्षण काही टक्के वाढवतात.

सुचवण्यात आलेला उपक्रम

विमाकर्त्याच्या, प्रस्तावकर्ता/विमाधारक व्यक्तीला सर्व माहिती जाहीर करण्याच्या जबाबदारीची काही उदाहरणे आम्ही वर नमूद केली. अशा आणखी काही उदाहरणांचा विचार करा ज्यामध्ये विमाकर्त्याने विमाधारकाला माहिती जाहीर करण्याच्या जबाबदारीचा समावेश आहे.

किंवा

विमाधारकाने प्रकट करण्याच्या जबाबदारीचे पालन न केल्यामुळे त्यांचे दावे, प्रकट न करण्याच्या आधारावर विमाकर्त्यांकडून फेटाळण्यात आल्याची काही प्रकरणे किंवा उदाहरणे इंटरनेटवरुन शोधून काढा. अशा प्रकारे दावे फेटाळण्याची कारणे अभ्यासा.

घ) वस्तुस्थिती तथ्ये

घ1 वस्तुस्थिती तथ्यांचे महत्व

वस्तुस्थिती तथ्यांची अशी व्याख्या केली जाऊ शकते की जी:
'हप्ता ठरविण्यासाठी किंवा जोखीम घेणार आहे का हे ठरवितांना समजदार विमाकर्त्याच्या निर्णयावर प्रभाव टाकतील.'
वरील व्याख्येवरुन आपण पाहू शकतो की महत्वाची तथ्ये अतिशय महत्वाची असतात कारण ती कंपनीच्या विमा लेखकाला दोन बाबी ठरविण्यास मदत करतात:

- जोखीम प्रस्ताव स्वीकाराचा किंवा नाकारायचा; आणि
- जर प्रस्ताव स्वीकारायचा असेल, तर तो कुठल्या किंमतीवर (हप्त्यांवर) स्वीकारायचा.

प्रस्तावकर्त्याला एखादे तथ्य महत्वाचे आहे का याबद्दल शंका असेल, आणि त्यासंदर्भात प्रस्ताव अर्जामध्ये विशिष्ट प्रश्न आहेत का याचा विचार न करता, त्यांनी ती जाहीर करावी. याचे कारण म्हणजे केवळ प्रस्तावकर्त्याकडेच संपूर्ण तथ्ये असतात आणि विमाकर्ता जेव्हा व्यवसाय स्वीकारत असतो तेव्हा त्याला ती सादर करणे योग्य असते.

कुठलेही तथ्य ज्यात सामान्यापेक्षा अधिक जोखीम असते ते नक्कीच महत्वाचे असते, त्यामुळेच जोखीमेच्या अपवादात्मक स्वरुपाचे वर्णन होते, किंवा विमा घेण्याचा विशेष हेतू सुचवला जातो.

घ)2 प्रकट न करण्याचे परिणाम

जर विमाधारकाने महत्वाची तथ्ये जाहीर करण्याच्या जबाबादारीचे पालन केले नाही, तर विमाकर्ता करार *अब इनिशियो* (सुरुवातीपासून) पूर्णपणे फेटाळू शकतो. दुसऱ्या शब्दात, कुठलेही दावे दिले जाणार नाहीत. जर फसवणुकीने तथ्य जाहीर करण्यात आले नसतील (ज्याला सामान्यपणे 'लपवणे' म्हणतात) तर विमाकर्ता हप्ता ठेवून घेऊ शकतो. कायद्याच्या नियमानुसार जर माहिती जाहीर केली नसेल तर त्यामुळे करारातील दुसऱ्या पक्षाला (विमाकर्ता) करार टाळण्यासाठी आधार मिळतो, जेव्हा तथ्याच्या बाबतीत:-

- पहिल्या पक्षाला (विमाधारक) **माहिती** असते;
- दुसऱ्या पक्षाला (विमाकर्ता) **माहिती नसते**; किंवा
- जाहीर केल्यास, **हिशेब** केल्यानंतर, दुसरा पक्ष त्यांना चांगल्या वाटतात त्या अटींवर करार करण्यास प्रवृत्त होईल, किंवा अजिबात करार करणार नाही.

घ)3 निर्विवाद कलम (विभाग 45)

विमा कायद्याच्या विभाग 45 मध्ये स्पष्ट करण्यात आल्याप्रमाणे, पॉलिसीच्या पहिल्या दोन वर्षात, प्रस्तावकर्त्याने काही महत्वाची तथ्ये जाहीर केली नसल्याचे विमा कंपनीला समजले, तर ती पॉलिसी रद्द केल्याचे जाहीर करु शकते. विमा कंपनी भरण्यात आलेले सर्व हप्ते ठेऊ शकते. हा हक्क विमा कंपनी पॉलिसीच्या केवळ पहिल्या दोन वर्षात वापरु शकते. दोन वर्षांनंतर, विमा कंपनीला पॉलिसी रद्द करायची असेल तर त्यांनी घोटाळा सिद्ध करायला हवा. या कलमाला 'निर्विवाद कलम' असे म्हणतात आणि ते जीवन विम्याला लागू होते.

घ)4 जीवन विमा: प्रकटीकरणाचे कर्तव्य

जीवन विम्याच्या बाबतीत, जेव्हा प्रस्ताव केला जातो तेव्हापासून ते विमा कंपनीने जोखीम स्वीकारुन पॉलिसीचे संरक्षण लागू करण्यापर्यंत प्रकटीकरणाचे कर्तव्य लागू असते.

जाणून घ्या

रद्द झालेली पॉलिसी पुन्हा सुरु करायची असेल, तर विमा कंपनी विमाधारकाला पुन्हा महत्वाची तथ्ये आणि तब्येत चांगली असल्याचा पुरावा पुन्हा सादर करण्यास सांगण्याची शक्यता आहे. पॉलिसी रद्द होणे आणि ती पुन्हा सुरु करणे याबाबत प्रकरणाच्या दुसऱ्या भागात चर्चा करण्यात आली आहे.

उदाहरण

परिस्थिती 1: अर्जुनने वयाच्या 30 व्या वर्षी एका विमा कंपनीकडून संपूर्ण जीवन पॉलिसी घेतली. प्रस्ताव अर्ज भरतांना अर्जुनने सर्व महत्वाची तथ्ये जाहीर केली. पाच वर्षांनंतर अर्जुनला मधुमेह असल्याचे निदान झाले. अर्जुनने हे तथ्य जाहीर केले नाही तरी पॉलिसीच्या संरक्षणावर त्याचा काही परिणाम होणार नाही कारण पॉलिसीचे संरक्षण सुरु झाल्यानंतर पाच वर्षांनी हे घडले आहे. अर्जुनची पॉलिसी रद्द झाली आणि त्याने ती नव्याने सुरु केली, तर त्यावेळी विमा कंपनी त्याला पुन्हा सगळी महत्वाची तथ्ये जाहीर करण्यास सांगू शकते.

परिस्थिती 2: वयाच्या 35 व्या वर्षी अर्जुनला आणखी एक पॉलिसी (ठराविक मुदत विमा) घ्यायची आहे पण त्याला आता मधुमेह आहे. यावेळी आता प्रस्ताव देतांना, परम सद्भावाच्या सिद्धांतानुसार, आपल्याला मधुमेह असल्याचे अर्जुनला जाहीर करावे लागेल.

अर्जुनने जाहीर केलेल्या माहितीच्या आधारे, विमा कंपनी त्याच्या प्रस्तावाचे मूल्यांकन करेल आणि ती जोखीम स्वीकारण्याचा किंवा फेटाळण्याचा निर्णय घेईल. जर कंपनीने जोखीम स्वीकारण्याचा निर्णय घेतला तर ती अर्जुनला किती हप्ता भरावा लागेल हे सांगेल.

जर अर्जुनने त्याला मधुमेह असल्याचे जाहीर केले नाही आणि विमा कंपनीला या तथ्याबद्दल 6 महिन्यांनी समजले तर कंपनी पॉलिसी रद्द केल्याचे जाहीर करु शकते आणि अर्जुनने तोपर्यंत भरलेले सगळे हप्ते घेऊ शकते.

च) क्षतिपूर्ती

क्षतिपूर्तीची व्याख्या अशी होऊ शकते की:-
'नुकसान होण्यापूर्वी जी आर्थिक स्थिती होती तशीच नुकसान झाल्यानंतर पुन्हा व्हावी यासाठी दिली जाणारी पुरेशी आर्थिक नुकसान भरपाई म्हणजे क्षतिपूर्ती'.

थोडक्यात, विमाधारकाचे काही नुकसान झाल्यास ते भरुन काढण्यासाठी पॉलिसीच्या अटी आणि नियमांनुसार विमा कंपनी क्षतिपूर्ती (भरपाई) देते.

उदाहरण

सुरेशने 2,00,000 रुपयांच्या विमा रकमेची वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी घेतली आहे. सुरेश आजारी पडला आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, ज्यामुळे रुग्णालयाचा खर्च 40,000 रुपये झाला. या प्रकरणात विमा कंपनी सुरेशला 40,000 रुपयांची भरपाई क्षतिपूर्ती देईल.

विमा नफा मिळवण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही

क्षतिपूर्तीचा सिद्धांत याची खात्री करतो की विमाधारकाला केवळ त्याचे नुकसान झाले आहे तेवढीच भरपाई मिळेल. अशाप्रकारे विमाधारकाला विम्याद्वारे नफा मिळणार नाही.

उदाहरण

राजेशने 1,00,000 रुपये विमा रकमेची वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी घेतली आहे. राजेशकडे त्याच्या कंपनीने दिलेला 1,00,000 रुपयांचा आरोग्य विमाही आहे. राजेश आजारी पडला आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, ज्यामुळे रुग्णालयाचे 25,000 रुपयांचे बिल आले. या प्रकरणात राजेश दोन्ही विमाकर्त्यांकडे 25,000 रुपयांचा दावा करु शकत

नाही. राजशेला केवळ एकूण 25,000 रुपयांच्याच दाव्याची भरपाई मिळेल. अशाप्रकारे क्षतिपूर्तीचा सिद्धांत याची खात्री करतो की विमा नफा कमावण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही.

सारांश: विमा कंपनीने दावा निकाली काढल्यानंतर विमाधारक हा अधिक चांगल्या किंवा अधिक वाईट स्थितीत नसेल याची क्षतिपूर्ती खात्री करते. ती याचीही खात्री करते की विमाकर्त्याच्या खर्चावर विमाधारकाला फायदा होणार नाही आणि विमाधारकाच्या खर्चावर विमाकर्त्याला फायदा होणार नाही.

च)1 क्षतिपूर्ती आणि जीवन विमा

सर्वसाधारण विमा पॉलिसी आणि आरोग्य विमा पॉलिसी हे क्षतिपूर्तीचे करार आहेत ज्यामध्ये विमाधारकाला काही नुकसान झाल्यास वर समजावण्यात आलेल्या सिद्धांतानुसार क्षतिपूर्ती दिली जाते.

मात्र जीवन विम्याला हे **लागू होत नाही**.

उदाहरण

अजितने 1,00,000 रुपयांची एडोमेंट पॉलिसी 10 वर्षांसाठी 10,000 रुपयांच्या वार्षिक हप्त्यावर घेतली असेल आणि त्याचा पॉलिसीच्या चौथ्या वर्षात मृत्यू झाला तर भोगवटादाराला 1,00,000 रुपयांची संपूर्ण रक्कम (व त्या कालावधीमध्ये जमा झालेला बोनस) मिळेल, अजितने केवळ चार वर्षेच हप्ता भरला असेल तरीही.

म्हणूनच जीवन विम्याच्या करारांना **मूल्य करार** म्हणतात आणि क्षतिपूर्तीचा सिद्धांत त्यांना लागू होत नाही. जीवन विम्याच्या संदर्भात, एका व्यक्तीने अनेक पॉलिसी घेतल्या तरी, विमाधारकाचा मृत्यू झाल्यास सर्व विमा कंपन्या संपूर्ण विमा रक्कम देतील.

म्हणून लक्षात ठेवा की जीवन विम्यासंदर्भात, क्षतिपूर्तीच्या सिद्धांताप्रमाणे, दावे वाटून घेण्याची संकल्पना लागू होत नाही; खालील उदाहरणाद्वारे आपण हे पाहू शकतो:

उदाहरण

मनीषने एबीसी कंपनीकडून 15,00,000 रुपयांची संपूर्ण जीवन विमा पॉलिसी घेतली आणि एक्सवायझेड कंपनीकडून 10,00,000 रुपयांची एंडोमेंट पॉलिसी घेतली. त्याचा पॉलिसीच्या कालावधीत मृत्यू झाल्यास, मनीषने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला दोन्ही विमा कंपन्या नुकसानभरपाई देतील. त्यामुळे मनीषने नामनिर्देषित केलेल्या व्यक्तीला दोन्ही विमा कंपन्यांकडून विम्याची एकूण 25,00,000 रुपयांची रक्कम (15,00,000 रुपये + 10,00,000 रुपये) मिळेल.

महत्वाचे मुद्दे

या प्रकरणामधील संकल्पनांचा सारांश खालील प्रमाणे देता येईल:

विम्याच्या वैध कराराची आवश्यक वैशिष्ट्ये

- जेव्हा एक पक्ष प्रस्ताव देतो आणि दुसरा पक्ष तो विनाअट स्वीकारतो तेव्हा करार अस्तित्वात येतो.
- विमा करारामध्ये, मोबदला म्हणजे प्रस्तावकर्त्याने विमा कंपनीला दिलेला हप्ता.
- अज्ञान, मानसिक स्थिती ठीक नसलेल्या आणि कायद्याने अपात्र ठरविलेल्या व्यक्ती विम्याचा करार करु शकत नाहीत.

विमा हित

- विमा हित म्हणजे व्यक्तीचा एखादी विषयवस्तू मग ते त्यांचे आयुष्य असेल, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे आयुष्य किंवा त्यांची संपत्ती असेल, यांचा विमा काढण्याचा व्यक्तिला असलेला कायदेशीर अधिकार.
- जेव्हा एखाद्या व्यक्तीचे विमा हित असते तेव्हा त्या व्यक्तीच्या किंवा संपत्तीच्या सुस्थितीत असण्याने त्याला फायदा होतो आणि त्यांचे काही नुकसान झाले तर विपरित परिणाम होतो.
- जिथे विमा हित लागू होते अशी इतर काही उदाहरणे म्हणजे कर्जपुरवठादार-कर्जदार, मालक-कर्मचारी आणि कर्मचारी-मालक, भागीदारांचे एकमेकांच्या आयुष्यात, आणि कंपनीचे महत्वाच्या व्यक्तींच्या आयुष्यात असलेले विमा हित.

परम सद्भाव

- विम्याच्या करारामध्ये करारातील दोन्ही पक्षांनी परम सद्भावानेच वागले पाहिजे.
- आपण 'परम सद्भावाची' अशी व्याख्या करु शकतो की, 'विनंती केली किंवा नाही तरीही स्वेच्छेने, प्रस्तावित जोखीमेची, सर्व महत्वाची तथ्ये, अचूक आणि पूर्ण जाहीर करण्याची सकारात्मक जबाबदारी'
- विम्याच्या सर्व वाटाघाटींमध्ये महत्वाची तथ्ये पूर्णपणे प्रकट करणे हे कर्तव्य आहे; विशेषतः प्रस्तावाच्या पातळीवर, करार अस्तित्वात येण्यापूर्वी, हे अतिशय महत्वाचे आहे.
- विमाकर्त्याची सुद्धा विमाधारकाला प्रकट करण्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी, विमाकर्त्याने परम सद्भावाने वागले पाहिजे.

महत्वाची तथ्ये

- महत्वाच्या तथ्यांची अशी व्याख्या केली जाऊ शकते की 'जी तथ्ये हप्ता ठरविण्यासाठी किंवा जोखीम घेतो आहे का हे ठरवितांना समजदार विमाकर्त्याच्या निर्णयावर प्रभाव टाकतात.'
- काही तथ्ये जाहीर करण्याची गरज नसते जसे, कायद्याची तथ्ये किंवा माहितीची तथ्ये.
- जर विमाधारकाने महत्वाची तथ्ये प्रकट करण्याच्या कर्तव्याचे पालन केले नाही, तर विमाकर्ता करार रद्द करु शकतो.

क्षतिपूर्ती

- क्षतिपूर्ती म्हणजे विमाधारकाला नुकसान होण्यापूर्वीच्या आर्थिक स्थितीत आणणे.
- विमाधारक वाढीव दावे करून नफा कमावण्यासाठी विमा वापरणार नाही याची क्षतिपूर्ती खात्री करते.
- क्षतिपूर्ती जीवन विम्याला लागू होत नाही कारण जीवन विमा करार मूल्य करार असतो.

प्रश्नोत्तरे

3.1 वैध कराराची आवश्यक वैशिष्ट्ये आहेत:

- प्रस्ताव आणि स्वीकार.
- मोबदला.
- करार करण्याची क्षमता.
- दोन्ही पक्षांची समान मुद्द्यावर सहमती.
- वस्तू किंवा हेतूचा कायदेशीरपणा.
- कार्यनिष्पादनाची क्षमता.

3.2 ज्या परिस्थितीमध्ये विमा हित लागू असल्याचे मानले जाते त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:-

- व्यक्तिचे स्वतःच्या आयुष्यात अमर्याद हित असते;
- पती किंवा पत्नीला एकमेकांच्या आयुष्यात हित असते;
- पालकांना मुलांच्या आणि मुलांना पालकांच्या आयुष्यात हित असते; आणि
- त्यांच्या संपत्तीमध्ये हित असते.

स्वयं-चाचणी प्रश्न

1. परम सद्भावाची व्याख्या द्या आणि त्याचा अर्थ स्पष्ट करा.
2. क्षतिपूर्ती म्हणजे काय?

तुम्हाला पुढच्या पानावर उत्तरे मिळतील.

स्वयं-चाचणी प्रश्नांची उत्तरे

1. परम सद्भावाची व्याख्या अशी केली जाऊ शकते की: ‘विनंती केली किंवा नाही तरीही स्वेच्छेने, प्रस्तावित जोखीमेची, सर्व महत्वाची तथ्ये, अचूक आणि पूर्ण जाहीर करण्याची सकारात्मक जबाबदारी.’

याचा अर्थ करार होण्यापूर्वी त्यातील सर्व पक्षांनी स्वेच्छेने महत्वाची माहिती दिली पाहिजे. हा सिद्धांत प्रस्तावकर्ता आणि विमाकर्ता यांना कराराच्या वाटाघाटींच्या संपूर्ण कालावधीत लागू होतो, मात्र कायद्यानुसार प्रस्तावकर्ता करारातील महत्वाच्या तथ्यांचा मुख्य पुरवठादार आहे.

2. क्षतिपूर्तीची व्याख्या अशी केली जाऊ शकते:
‘नुकसान होण्यापूर्वी जी आर्थिक स्थिती होती तशीच नुकसान झाल्यानंतर पुन्हा व्हावी यासाठी दिली जाणारी पुरेशी आर्थिक भरपाई’.

याचा अर्थ काही नुकसान झाल्यास विमा कंपनी त्यासाठी विमाधारकाला पॉलिसीच्या अटी आणि नियमांनुसार क्षतिपूर्ती (भरपाई) देते.